# बृहन्मुंबई महानगरपालिका

## घन कचरा व्यवस्थापन,पी/दक्षिण

**सहा.अभि.(घकव्य/ 9056 /पी/दक्षिण दिनांक 27/11/2025**

## <u>जाहिर सुचना</u>

पी/दक्षिण विभागातील गोरेगाव (प.) लिंक रोड येथील सबकुछ रेस्टारंट जवळील एम.एल. चौकी प्लॉटवर बृहन्मुंबई महानगरपालिकेने स्वत:च्या फंडातून पंचतारांकित प्रसाधनगृह बांधलेले आहे. सदर शौचालयाचे **10वर्षांकरीता** प्रचालन व परिरक्षण करण्याकरीता इच्छुक असलेल्या संस्थाचे अर्ज मागविण्याचे व पात्र संस्थांमधून **सोडत पद्धतीने** यशस्वी संस्थेची निवड करण्याचे प्रस्तावित आहे. यशस्वी संस्थेला सदर प्रसाधनगृहातील सेवा नि:शुल्क दयाव्या लागतील आणि अनुज्ञापन विभागाच्या मंजूरीने शौचालयाच्या उपलब्ध जागेवर जसे की **9' X18', 7' X 22', 3' X4', 5'X8',3'X8', 5'X8', 20'X 20'**, इतक्या आकाराच्या जाहिराती लावून प्रसाधनगृहाचा दैनंदिन प्रचालन व परिरक्षणाचा खर्च जाहिरातीद्वारे मिळणा-या उत्पन्नातून यशस्वी संस्थेला करावा लागेल.

**अर्जा सोबत जोडावयाची कागदपत्रे व पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे असतील.**

1. नोंदणीकृत सोसायटी अथवा ट्रस्ट, अथवा नोंदणीकृत भागीदारी संस्था, नोंदणीकृत कंपनी किंवा खाजगी व्यक्ती / नोंदणीकरण प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावे.
2. अर्जदार संस्थांकडे त्यांनी स्वत: किंवा त्यांच्या एजन्सीद्वारे केलेल्या किमान एक शौचालयाचे प्रचालन व परिरक्षण केल्याचा अनुभव, अशा प्रसाधनगृहाचा पत्ता, पुरावा म्हणून आवश्यक दस्तावेज तसेच संबंधित महानगरपालिकेचा किंवा इतर प्राधिकरणाच्या सक्षम अधिकाऱ्याचा दाखला असावा. एखादया जागेसाठी अनुभवपात्र संस्थेकडून अर्ज न आल्यास सदर अट शिथिल करण्याचा अधिकार छाननी समितीला असेल.
3. नोंदणीकृत कंपनीच्या प्रकरणामध्ये मेमोरेंडम ऑफ़ आर्टिकल्स असोसिएशन किंवा सोसायटी किंवा ट्रस्ट्च्या प्रकरणामध्ये नोंदणीच्या प्रमाणपत्रासह उपविधीची प्रत जोडावी.
4. संस्थेचे सभासद/मालक/भागीदार/संचालक/मुखत्यार/कंपनीधारकांच्या सभासदांचे स्वाक्षरीसह पासपोर्ट आकाराचे छायाचित्रे, दुरध्वनी क्रमांक, पॅन कार्ड, ई-मेल आणि त्यांचे राहण्याचे पत्ते इ. माहिती रु. 500/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी करुन त्याची मुळ प्रत जोडावी.
5. मागील तीन वर्षाची उलाढाल दर्शविणारी बँक खात्याची सक्षम लेखा परिक्षकाने तपासलेली प्रत जोडावी.
6. मुंबई महानगरपालिकेमधील अर्जदार संस्थेने सध्या देखभाल करीत असलेल्या शौचालयाचे कार्यादेश किंवा मनपा सोबत केलेला करारनामा प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
7. मनपा हद्दीत अर्जदार सध्या देखभाल करण्यात येत असलेल्या प्रसाधनगृहाची पत्यासह यादी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
8. अर्जदार संस्थेच्या जबाबदार पदाधिका-याचे स्वाक्षरीने प्रसाधनगृह कोणत्याही इतर संस्थेस चालवण्यास देण्यात येणार नाही किंवा त्यासंबंधी करारनामा करता येणार नाही असे प्रतिज्ञापत्र बृहन्मुंबई महानगरपालिकेस लिहून देणे बंधनकारक राहिल व अर्जासोबत जोडणे बंधनकारक असेल.
9. काळ्या यादीत समाविष्ट असलेल्या संस्थेस बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात तसेच मनपाच्या कोणत्याही योजनेमध्ये सहभाग घेता येणार नाही व त्यांचे अर्ज अप्रतिसादी समजण्यात येतील.
10. अर्जदार संस्था अर्ज करण्यापुर्वी सर्व आवश्यक बाबी, अर्जासोबतचे कागदपत्राची खातरजमा करतील आणि अर्ज सर्व बाबींनी परिपुर्ण आहे याची खात्री करतील.
11. काम सुरु करण्यासाठी विविध प्राधिकरणांकडून आवश्यक असणाऱ्या अधिकृत मंजुरी प्राप्त करण्यासाठी अर्जदार संस्था संबंधित प्राधिकरणाकडे पाठपुरावा करतील.
12. संस्थेने अर्ज सादर करण्यापुर्वी कागदपत्रांची संपुर्ण आणि काळजीपुर्वक तपासणी केलेली आहे. तसेच प्रसाधनगृहाच्या प्रस्तावासंबंधी सर्व माहिती प्राप्त केलेली आहे असे समजण्यात येईल.

13. निवड झालेल्या अशासकीय संस्थेला सदर प्रसाधनगृहाचे स्ट्रक्चरल ऑडिट नुसारदुरुस्ती वा पुनर्बांधणी करण्याची आवश्यकता असल्यास संबंधित विभागाची मंजुरी घेऊन सदर शौचालयाचीदुरुस्ती वा पुनर्बांधणी स्ट्रक्चरल ऑडिट अहवालनुसार स्वखर्चाने करावी लागेल. त्याकरीता इच्छुक अशासकीय संस्थेने सदर प्रसाधनगृहाच्या सदयस्थितीची पाहणी करावयाची आहे.
14. निवड झालेल्या अशासकीय संस्थेला सदर प्रसाधनगृहामध्ये जल जोडणी, विज जोडणी व इतर आवश्यक बाबी स्वत: करावयाच्या आहेत.
15. सदर प्रसाधनगृहाचे प्रचालन व परिरक्षण करीत असताना वीज देयके व जल देयकांचा खर्च निवड झालेल्या अशासकीय संस्थेला स्वत: करायचा आहे.
16. सोडतीतील यशस्वी संस्थेने सदर प्रसाधनगृहाची दुरूस्ती झाल्यानंतर मनपाने प्रमाणित केलेल्या वास्तुशास्त्रज्ञाने तयार केलेला स्ट्रक्चरल ऑडिट अहवाल कार्यालयात सादर केल्यानंतरच प्रसाधनगृह प्रचालन व परिरक्षणाकरीता देण्यात येईल.
17. यशस्वी संस्थेला प्रसाधनगृहाच्या प्रचालन व परिरक्षणाचा खर्च जाहिरातीद्वारे मिळणा-या उत्पन्नातून करावा लागेल. प्रसाधनगृहावर लावण्यात येणा-या जाहिरातीच्या जागा, संख्या व आकार याकरीता मंजूरी अनुज्ञापन विभागाकडून घ्यावी लागेल.
18. यशस्वी संस्थेला 10 वर्षाकरीता रु.50000/-इतकी अनामत रक्कम जमा करावी लागेल.
19. यशस्वी संस्थेला प्रसाधनगृहाच्या सर्व सोयी - सुविधा नि:शुल्क उपलब्ध करून दयाव्या लागतील.
20. क्र.एमजीसी/एफ/4561/दिनांक16/10/2014व
क्र.डी.एम.सी./घकव्य/229/दिनांक23/04/2018परिपत्रकातीलनमुद इतर अटी व शर्ती.
21. सदर शौचालयाचे प्रचालन व परिरक्षण व्यवस्थितरित्या नाही झाल्यास संस्थेस पूर्वसुचना न देता मनपाच्या ताब्यात घेण्यात येईल.

इच्छुक संस्थांनी आपले अर्ज दिनांक **27/11/2025 ते 04/12/2025**रोजी दुपारी 1:00 वाजेपर्यंत खालील पत्त्यावर जमा करावे.

**<u>कार्यालयाचा पत्ता</u>**
सहा.अभि.(घकव्य)यांचे कार्यालय
पी/दक्षिण विभाग कार्यालय
सी.टी एस .क्र. ७४६, व्हिलेज पहाडी,
स्वामी विवेकानंद मार्ग, गोरेगाव (प)
मुंबई -४०० १०४,

सही/-

**सहा.आयुक्त(पी/दक्षिण)**